Publication: Apla Mahanagar
Date: 5/5/2019
Page: 3
Column: 2-4

आपलं महानगर
मुंबई । रविवार, ५ मे २०१९

# झामजड पाडा विजेच्या प्रकाशाने उजळला

## गोराई नजीकच्या पाड्याची ७० वर्षांची प्रतीक्षा संपली

खास प्रतिनिधी ▸▸ मुंबई

मुंबईतून अगदी हाकेच्या अंतरावर असलेल्या गोराईनजीकच्या झामजड पाड्यातील रहिवाशांना आता विजेचा मोठा आधार मिळाला आहे. स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच झामजड पाड्यातील रहिवाशांनी अखेर घरोघरी विजेचा प्रकाश पाहिला आहे. तब्बल ७० वर्षांची प्रतीक्षा संपल्यानंतर त्यांचं राहणीमान उंचावणार असं पाऊल अदाणी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेडकडून उचलण्यात आले आहे.



एईएमएलच्या वीज वितरणाच्या जबाबदारीत एक मोठी कामगिरी या निमित्ताने पार पाडण्यात आली. गेल्या काही दिवसांपासून याठिकाणी वीज यंत्रणा पोहचवण्यासाठीचे काम सुरू होते. अखेर या आठवड्यात संपूर्ण वायरिंगचे काम पूर्ण झाले आणि झामजड पाड्यात वीज पोहचली. एईएमएलचे कर्मचारी तसेच स्थानिकांच्या साथीने ही वीज पोहचली आहे. ३ मे रोजी पहिल्यांदा इथे विजेचा प्रकाश आला. ग्रामस्थांनी एकत्र येऊन नाचत गात हा आनंद साजरा केला. आम्ही गोराईतील झामजड पाडा येथील विजेचे काम पूर्ण केले आहे. गावातील कुटुंबांनी घेतलेल्या प्रयत्नांमुळे आम्ही हे काम पूर्ण करू शकलो. आपली घरे प्रकाशाने उजळलेली पाहताना या ग्रामस्थांच्या चेहऱ्यावर आलेली झळाळी पाहणे हा अत्यंत समाधानकारक अनुभव होता, असे एईएमएलचे प्रवक्ता म्हणाले.

शहरापासून अवघ्या २० किमी. अंतरावर एका छोट्या डोंगरावर असलेला झामजड पाडा मागील १० वर्षे प्रयत्नशील आहे. विजेचे काम पूर्ण झाल्यामुळे आता हे गाव शहराच्या अधिक नजीक आले आहे. आजवर हे शहर त्यांना बेटाच्या पलिकडे असलेले चमकणारे शहर वाटत होते. आता इथली मुले रात्रीही दिव्याच्या प्रकाशात अभ्यास करू शकतील आणि कामावर जाणाऱ्यांना कोणतीही भीती न बाळगता रात्री घराबाहेर पडता येईल, असा विश्वास ग्रामस्थांना वाटतो. या गावांमध्ये वैद्यकीय सेवा पुरवणेही सोपे होईल तसेच वीज आल्याने विकासाचा मार्ग खुला झाला आहे, असे झामजड पाड्यातील ग्रामस्थांना वाटते.